नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/02/2023 (गुरूवार) दुपार

## अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलीचा घेतला शोध
## (स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई)

**पो.स्टे. खापा :–** दिनांक ०२/१२/२०२२ रोजी खापा हद्दीतील मौजा हत्तीगोठा दर्गा येथे सौ. रशिदा बेगम अब्दुल सलीम शेख वय ५० वर्ष रा. टेका नाका सय्यद जल्लालुदीन दर्गा नागपुर यांचे १६ वर्षीय अल्पवयीन नातीणला सोहल उर्फ शोबु नावाच्या इसमाने अपहरण करून नेल्याबाबत तक्रार पोलीस ठाणे खापा येथे प्राप्त झाली. प्राप्त तक्रारीची दखल घेवुन आरोपीविरूद्ध कलम ३६३ भांदवि अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हयाचा तपास खापा पोलीसांनी सुरू केला व पिडीत अपहृत मुलीचा शोध घेण्यास सुरूवात झाली. परंतु पिडीत मुलगी मिळुन आली नाही. या प्रकरणात नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक तयार करून पिडीत मुलीचा शोध घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार पोलीस स्टेशन खापा गुन्हे रजि. नं. ३७७/२०२२ कलम ३६३ भादवि. प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला. तपासा दरम्यान यातील आरोपी नामे– सोहेल उर्फ शोबु खालिद शेख, रा. सतरंजिपुरा नागपूर यास पोलीस स्टेशन हुडकेश्वर नागपूर शहर पोलीसांनी अप क्र. ७४/२३ कलम ४५४, ४५७, ३८०, ४१४ भांदवि. मध्ये अटक केली असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यास दिनांक १५/०२/२०२३ रोजी न्यायालयात पेश करत असुन त्याचे भेटीला सदर गुन्हयातील अपहृत मुलगी वय १६ वर्ष ही आरोपीचे आई वडीलासह येणार असल्याची खात्रीशीर माहिती मुखबिरव्दारे प्राप्त झाल्याने स्टाफसह न्यायालय परीसराचे बाहेर सापळा रचुन अपहृत मुलगी येताच तिला महिला स्टाफचे मदतीने कायदेशिररीत्या ताब्यात घेतले. सदर प्रकरणी अपहृत मुली बाबत बोनाफाइड सर्टिफिकेट तपासुन खात्री झाल्याने कायदेशीर प्रक्रिया पुर्ण केली.

सदर गुन्हयातील आरोपीस न्यायालयाने न्यायालयीन कोठडी दिल्याने आरोपी मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे असुन अपहृत अल्पवयीन मुलगी हिला पुढील कायदेशीर प्रक्रीयेकरीता पोलीस स्टेशन खापा यांचे ताब्यात सोपविले.

सदरची कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात श्री. ओमप्रकाश कोकाटे पोलीस निरीक्षक, सहायक फौजदार चंद्रशेखर घडेकर, पोलीस हवालदार निलेश बर्वे, अरविंद भगत, पोलीस नायक किशोर वानखेडे, अजीज शेख, बालाजी साखरे, महिला पोलीस नायक नम्रता बघेल, स्वाती हिंडोरीया, कविता बचेले स्थानिक गुन्हे शाखा यांचे पथकाने पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर